अंक - ८ वा

दिनांक :-
२२ फेब्रुवारी २०२१

# सायबर सारथी

## (साप्ताहिक माहितीपत्र)

## सायबर सेल


गुन्हे शाखा
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

# ई मेल फिशिंग




कोरोना व्हायरस मूळे जगभरात मोठ्या कालावधीसाठी लॉकडाऊन करण्यात आले होते. या काळात घरातून बाहेर पडण्यावर असणाऱ्या निर्बंधांमुळे घरातच थांबावे लागत होते. या कालावधीत वेळ घालविण्यासाठी, मनोरंजनाकरिता कोट्यवधी लोकांनी इंटरनेटचा वापर केला. या कालावधीत इंटरनेटचा नेहमीपेक्षा प्रचंड मोठ्या प्रमाणात वापर करून कोट्यवधी लोक सायबर स्पेस मध्ये वेळ घालवू लागले. यामुळे सायबर गुन्हेगारांना मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध झाल्या. कधी लिकरची फ्री होम डिलीव्हरी, **Netflix, Amazon Prime तसेच इतर OTT** प्लॅटफॉर्मचे फ्री सबस्क्रिप्शन याचेकरिता तर कधी कोरोना व्हायरस चे लसीचे नोंदणी करणे करिता अनेकांना **ई मेल द्वारे** संपर्क करून, त्यांची **वैयक्तिक व खाजगी माहिती चोरून त्यांची फसवणूक केली आहे.**
याच काळात लोकांच्या मनातील भीती आणि समाजात नाचक्की करण्याची धमकी देऊन त्यांना ई मेल द्वारे ब्लॅकमेल करण्याचे प्रकार देखील उघडकीस आले आहेत.

# काय होता हा प्रकार



अनेक व्यक्तींना अनोळखी ई मेल आय डी वरून एक ई मेल प्राप्त होतो. ज्यात ई मेल पाठवणारा दावा करतो की त्याने तुमचे ई मेल अकाउंट हॅक करून तसेच तुम्हाला एक मालवेअर पाठवून तुमच्या सर्व डिव्हाईस चा ताबा घेतला आहे. (Remote Access). त्याद्वारे तुमचे सर्व खाजगी फोटो, तुमच्या बँकेची, क्रेडिट आणि डेबिट कार्डची माहिती त्याचेजवळ आहे. याचसोबत त्याने रिमोट ॲक्सेस द्वारे तुम्ही जेंव्हा पोर्न साईटला भेट देत होता तेंव्हा चोरून तुमचे चित्रीकरण केले आहे. तुमचे केलेले असे चित्रीकरण सोशल मीडियावर आणि पोर्न साईटवर तो अपलोड करू शकतो. त्यामुळे समाजात तुमची नाचक्की होईल. तसेच तुमचे खाजगी फोटो आणि व्हिडिओ देखील त्याचेजवळ असून ते देखील व्हायरल केले जाऊ शकतात.
याचसोबत तुमच्या बँकेची माहिती वापरून ते तुमच्या खात्यातील पैसे देखील काढू शकतात. हा प्रकार टाळावयाचा असल्यास त्यांनी दिलेली बिटकॉइन ॲड्रेस वर या क्रीप्टोकरन्सी मध्ये ठराविक रक्कम जमा करा अन्यथा परिणामाला सामोरे जा अशी धमकी दिली जाते.

पोर्न साईटचा वापर करणाऱ्या व्यक्तीला असा मेसेज आल्यास त्याच्या भीतीमुळे आणि सामाजिक पद धोक्यात आल्यामुळे अगदी थोड्या प्रमाणात लोकांनी या गुन्हेगारांना पैसे पाठविले आहेत. अधिकतर लोक अशा तक्रारी घेऊन सायबर सेल येथे येतात आणि त्यांना योग्य मार्गदर्शन केले जाते.

# कसे मिळतात आपले मेल आय डी या गुन्हेगारांना



सायबर स्पेस मध्ये वावरताना अनेक वेबसाईटचा वापर करण्याकरिता त्या वेबसाईटवर आपले युजर अकाऊंट तयार करण्यास सांगितले जाते. त्याकरिता आपला ई मेल नोंदवावा लागतो. सध्या अधिकाधिक वेबसाइट्स लॉग इन युझिंग मेल आय डी हा पर्याय उपलब्ध करून देतात. याद्वारे आपल्याला प्रत्येक वेळी नवीन युजर अकाऊंट तयार करणे, त्याचा पासवर्ड तयार करणे तो लक्षात ठेवणे याची गरज राहत नाही त्यामुळे हा पर्याय फार मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाला आहे. परंतु जेंव्हा अशा वेबसाईट ज्यावर आपण युजर अकाऊंट तयार केले आहे किंवा मेल आय डी वापरून लॉग इन केले आहे या हॅकर्स द्वारे सायबर अटॅकला बळी पडतात तेंव्हा कोट्यवधी युजर अकाऊंटची माहिती हॅकर्स ला मिळते आणि तिची मोठ्या किमतीला हे हॅकर्स डार्क वेबवर विक्री करतात. या माहितीचा खरेदीदार माहितीच्या आधारे इतरांची ओळख चोरून तिचा बेकायदेशीर कामांकरिता वापर करतो. अनेक सायबर गुन्हेगार त्यांनी प्राप्त केलेल्या या माहितीच्या आधारे ई मेल द्वारे लोकांना संपर्क करून फसवण्याचा प्रयत्न करतात याला फिशिंग असे म्हणतात.

## फिशिंग

ज्याप्रमाणे मासा पकडण्यासाठी गळ टाकला जातो आणि मासा त्या गळाला अडकण्याकरिता माशाचे खाद्य त्या गळाला लावले जाते त्याप्रमाणे सायबर गुन्हेगार ई मेल द्वारे लोकांना आमिष दाखवून त्यांची फसवणूक करून त्यांना आपल्या गुन्ह्याचा बळी बनवतात. ही फार पूर्वीपासून चालत आलेली मोडस असल्याने काळानुरूप त्यात सायबर गुन्हेगारांनी बदल करून आता आमिषाऐवजी लोकांच्या मनातील त्यांची समाजातील पत गमावण्याची आणि त्यांची वैयक्तिक माहिती सोशल मीडियावर अपलोड होण्याची भीतीचा वापर करून त्यांची फसवणूक करण्याचे प्रकार घडत आहेत.

# तुम्हाला असा ई मेल प्राप्त झाल्यास काय कराल




तुम्हाला जर असा ई मेल प्राप्त झाल्यास घाबरून जाऊ नका. आलेल्या ईमेल ला रिप्लाय करू नका.

असा मेल प्राप्त झाल्यास त्याला **MARK AS SPAM** करा म्हणजे तुम्हाला असे ई मेल प्राप्त न होता ते तुमच्या **spam folder** मध्ये जातील.

तुमच्या ईमेल मधील स्पॅम फोल्डर मध्ये असणारे मेल वेळोवेळी न उघडता, न वाचता डिलीट करा.

असा ईमेल पाठवणाऱ्याना पैसे पाठवू नका.

सदरच्या ईमेलची माहिती तात्काळ आपल्या नजीकच्या सायबर सेल अथवा पोलीस स्टेशनला द्या.

## खबरदारीचे उपाय

- तुम्ही नेहमी वापरात असलेला ईमेल आय डी जो तुमच्या बँक अकाऊंट, सोशल मीडिया, व्यावहारिक काम किंवा खाजगी पत्रव्यवहाराकरिता तयार केला आहे त्याकरिता लक्षात ठेवायला सोपा परंतु इतर कुणासही अंदाज करून ओळखता येणार नाही असा ठेवा.

- कमीत कमी १०० दिवसांनी एकदा आपला पासवर्ड बदला.

- आपल्या सर्व डिजिटल अकाऊंट साठी **TWO FACTOR AUTHENTICATION** वापरा.

- आपला खाजगी/ महत्वाचा ईमेल जो आपल्या मोबाईल, लॅपटॉप, टॅबलेट तसेच इतर डिव्हाईस मध्ये लॉग इन केलेला आहे तो वेबसाईट वरील माहिती वाचण्याकरिता अथवा डाऊनलोड करण्याकरिता लॉग इन करण्यासाठी वापरू नका. त्याकरिता एक स्वतंत्र ईमेल आय डी तयार करा आणि तो मेल आय डी वैयक्तिक अथवा व्यावहारिक कारणासाठी वापरू नका.

# सावध व्हा, सुरक्षित रहा

अधिक माहिती करिता संपर्क -

## सायबर सेल

गुन्हे शाखा,
पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय

**Mail- cybercell.pcpc-mh@mahapolice.gov.in**
**Contact No.- 020- 27350939**